
सकाळ TODAY
कोल्हापूर, मंगळवार, १ जुलै २०२५


# शिक्षणाला मिळाले नवे रूप

## क्लासरूम; बदलत्या काळानुसार वाटचाल

01/07/2025



कोल्हापूर : न्यू कॉलेजने ई-लर्निंग अंतर्गत ई-कंटेट निर्मितीसाठी स्वतःचा स्टुडिओ उभारला आहे.



कोल्हापूर : महाविद्यालयांमध्ये इंटरॲक्टिव्ह बोर्डच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जात आहे.



**बदलती महाविद्यालये**

भाग- १

### दृष्टिक्षेपात जिल्हा

| तालुका | महाविद्यालये | शिक्षक | विद्यार्थी | विद्यार्थिनी |
|---|---|---|---|---|
| करवीर | ४० | १२८६ | २३९७६ | २०९७९ |
| हातकणंगले | २२ | ५३७ | ९३७३ | ८३२८ |
| पन्हाळा | १३ | ३११ | ५७९४ | ३३५३ |
| गडहिंग्लज | १३ | ४५२ | ६१४१ | ५३१४ |
| कागल | ९ | १७० | ३०३१ | ३७४७ |
| शिरोळ | ८ | ११६ | ३१०५ | २६२१ |
| चंदगड | ६ | १३८ | २२७४ | २००४ |
| राधानगरी | ६ | ९१ | ७९१ | ९७९ |
| शाहूवाडी | ५ | ९९ | ११५८ | १३३५ |
| भुदरगड | ३ | ५३ | १३३३ | १५०७ |
| आजरा | २ | २९ | ११०८ | ८३८ |
| गगनबावडा | २ | ६८ | १४७८ | ५०० |
| **एकूण** | **१२९** | **३३५०** | **५९५६२** | **५१५०५** |

### व्हॉटस्ॲप, इन्स्टाग्रामवर नोटस्

सोशल मीडियावरील व्हॉटस्ॲप, इन्स्टाग्राम या प्लॅटफॉर्मवर विद्यार्थ्यांचे ग्रुप तयार करून त्यावर महाविद्यालयांतील प्राध्यापकांकडून नोटस् पाठविल्या जातात. प्रथम; द्वितीय, तृतीय असे वर्षनिहाय ग्रुप तयार केले आहेत. त्यात परीक्षा, शैक्षणिक उपक्रमांची माहितीही विद्यार्थ्यांना दिली जाते. परीक्षाविषयक कामात गुगल फॉर्मचा वापर केला जातो. गुगल क्लासरुम, मॅसिव्ह ओपन ऑनलाईन कोर्स (मूक), यू-ट्यूब, स्वयंम, दीक्षा प्रणालीचा उपयोग करण्यात येत आहे. झूम, वेबेक्स, गुगल मीटच्या माध्यमातून ऑनलाईन लेक्चर घेण्यात येत असल्याचे विवेकानंद कॉलेजचे सहायक प्राध्यापक डॉ. दीपक तुपे यांनी सांगितले.

### 'लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीम'चा वापर

बहुतांश महाविद्यालयांनी लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीमचा (एलएमएस) वापर सुरू केला आहे. त्यावर ऑडिओ-व्हिडिओच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जात आहे. नैसर्गिक आपत्ती अथवा काही कारणास्तव विद्यार्थ्यांना वर्गात येणे शक्य नसल्यास त्यांना या सिस्टीमच्या माध्यमातून घरबसल्या अथवा कुठूनही आणि कधीही शिक्षण घेता येते. 'एलएमएस'च्या माध्यमातून शैक्षणिक साहित्याची निर्मिती, विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यासह मूल्यांकनही महाविद्यालयांकडून केले जात आहे.

“ पुस्तकांबरोबरच डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जिल्ह्यातील महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते. महाविद्यालयांच्या बदलत्या स्वरुपाचा चांगला परिणाम दिसून येत आहे. विद्यार्थ्यांचाही त्याला सकारात्मक प्रतिसाद आहे.

**- डॉ. व्ही. एम. पाटील**, सचिव, शिवाजी विद्यापीठ प्राचार्य असोसिएशन

“ राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार महाविद्यालयांनी बदल स्वीकारले आहेत. त्यात इंटरॲक्टिव्ह बोर्ड, डिजिटल-स्मार्ट क्लासरूममुळे शिक्षण देण्याच्या पद्धतीला आधुनिक स्वरूप मिळाले असून, ते निश्चितपणे विद्यार्थी, महाविद्यालयांना उपयुक्त ठरत आहे.

**- डॉ. आर. आर. कुंभार**, प्राचार्य, विवेकानंद कॉले

हॅलो प्रभात

# विवेकानंद कॉलेजमध्ये जॉब ट्रेनिंग व फील्ड प्रोजेक्ट उपक्रम

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

नवीन शैक्षणिक धोरण नुसार विवेकानंद कॉलेज च्या विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने बी एस सी भाग विधर्थ्यांचे दि. २६ ते २८ या दरम्यान जॉब ट्रेनिंग व फिल्ड प्रोजेक्ट हे उपक्रम झाले.सदर उपक्रमासाठी महाविद्यालया चा माजी विद्यार्थी पृथ्वीराज पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले



पहिल्या दिवशी विविध औद्योगिक क्षेत्र मधून बाहेर पडणारे सांडपाणी, त्या वर करावी लागणारी प्रक्रिया व तपासणी यावर विद्यार्थ्यांनी प्रयोग शाळेत प्रात्यक्षिक केले दुसऱ्या दिवशी जिल्हापरिषद कार्यलाय कोल्हापुर येथे बसवण्यात आलेल्या बायोगॅस प्लांट ला भेट देणेतआली जिथे कॅन्टीन किचन मधून तयार होणाऱ्या कचऱ्या पासून बायोगॅस तयार होतो याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी अनुभवलेतिसऱ्या दिवशी सांगली येथे युिष फ्रुट प्रोसेसिंग व कॅनिंग सेंटर येथे फळ प्रक्रिया करून त्या पासून तयार होणारे पदार्थ याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी केलेसदर उपक्रमासाठी महाविद्यालया चे प्राचार्य डॉ आर आर कुंभार, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ.श्रुती जोशी यांचे मार्गदर्शन लाभले तसेचप्रा.एस.जी. कुलकर्णी व डॉ.एस.बी.मुल्ला यांचे सहकार्य लाभले. यामध्ये बी एस सी भाग ३ च्या एकूण ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

लोकमत
कोल्हापूर, मंगळवार, दि. १ जुलै २०२५

# पहिल्या दिवशी १६८१ विद्यार्थ्यांनी घेतले प्रवेश

## महाविद्यालयांत झुंबड : अकरावीची प्रक्रिया सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** अकरावीची गुणवत्ता यादी शनिवारी जाहीर झाल्यानंतर अलॉटमेंट झालेल्या जिल्ह्यातील १६८१ विद्यार्थ्यांनी सोमवारी विविध कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतला. यामध्ये विज्ञान शाखेच्या ९३९, कला शाखेच्या ४१० तर वाणिज्य शाखेच्या ३३२ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. अधूनमधून पावसाच्या सरी कोसळत असतानाही विद्यार्थ्यांसह पालकांनी रांगेत उभा राहून प्रवेश निश्चित केले.

अकरावी केंद्रीय ऑनलाईन प्रवेशाची सर्वसाधारण अंतिम गुणवत्ता यादी शनिवारी सायंकाळी जाहीर झाली. यात पहिल्या फेरीत २१ हजार विद्यार्थांची अलॉटमेंट झाली.

**२८५**
कनिष्ठ महाविद्यालयांत ६६,०१० जागांसाठी प्रवेश प्रक्रिया



अकरावीची गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर सोमवारी कोल्हापुरातील विवेकानंद महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांची गर्दी उसळली. **छाया : आदित्य वेल्हाळ**

जिल्ह्यात कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेसाठी २८५ कनिष्ठ महाविद्यालयांतील ६६ हजार १० जागांसाठी ही प्रवेश प्रक्रिया सुरू आहे.

पहिल्या फेरीसाठी ४१ हजार ८९९ ऑनलाइन नोंदणी झाली होती. त्यानंतर व्यवस्थापन, इन-हाऊस कोट्यामध्ये १५७९ प्रवेश झाले आहेत. पहिल्या फेरीत अलॉटमेंट झालेल्या विद्यार्थ्यांना ३० जून ते ७ जुलैदरम्यान प्रत्यक्ष कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन प्रवेश निश्चित करता येणार आहे. ९ जुलै रोजी प्रवेशाची दुसरी फेरी सुरू होणार आहे.

जिल्ह्यात शिवाजी विद्यापीठ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ संलग्न ३० महाविद्यालये आहेत. यात १५ हजारांहून अधिक प्रवेश क्षमता आहे.

अभियांत्रिकी प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर झाले असून ऑनलाइन नावनोंदणीस प्रारंभ झाला आहे. कागदपत्रे पडताळणी व कन्फर्मेशन करण्यासाठी ३० जून ते ९ जुलै, १२ जुलैला तात्पुरती गुणवत्ता यादी, १३ ते १५ जुलैदरम्यान गुणवत्ता यादीवर हरकती, तक्रारी नोंदवणे तर १७ जुलैला अंतिम गुणवत्ता यादी जाहीर होईल, असे प्रवेशाचे वेळापत्रक आहे.

### अभियांत्रिकीसाठी ८ जुलैपर्यंत अर्ज करता येणार

१ अभियांत्रिकी (बीई, बीटेक) प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष प्रवेश प्रक्रिया नावनोंदणीची प्रक्रिया सुरू झाली आहे.

२ त्यानुसार ८ जुलैपर्यंत विद्यार्थांना अर्ज करता येणार आहे.